दोन मित्र – मांजर आणि कुत्रा

कॅटरीना वादळ, मैत्री आणि जिवंत वाचण्याची एक सत्य कहाणी


किर्बी लार्सन

मराठी: अश्विनी बर्वे



दोन मित्र – मांजर आणि कुत्रा

कॅटरीना वादळ, मैत्री आणि जिवंत राहण्याची एक सत्य कहाणी




किर्बी लार्सन

मराठी: अश्विनी बर्वे

बॉब कुत्र्याला आणि बोबो मांजराला शेपूट दोघानाही शेपूट नव्हती. काही लोकांच्या म्हणण्यानुसार याच गोष्टीमुळे दोघे एकत्र आले. तसे तर कोणालाच माहीत नव्हते की ते दोघे कसे भेटले. कदाचित त्यांच्या मालकाच्या मनात विना शेपटाच्या पाळीव प्राण्याबद्दल प्रेम असेल. पण ते दोघे प्राणी वास्तवात असे मित्र होते ज्यांना त्यावेळी एकमेकांची खूप गरज होती.

त्या दोघांची ही कहाणी आहे.





न्यू ऑरलियन्स शहर, शक्तिशाली मिसिसिपी नदीवर आहे. तिथे खूप लोकांची आणि पाळीव प्राण्याची घरे आहेत. जैज़ संगीत, फैंन्सी कपडे घालून जैमिंग, यामुळे इथे दिवस-रात्र, इथे चहलपहल असते.


पण २९ ऑगस्ट २००५ कॅटरिना वादळाने शहराला आणि तिथे राहणाऱ्या सर्व लोकांना संकटात टाकले.त्यात एक मांजर आणि एक कुत्रा होता.



वारे ११० मैल प्रती तासाच्या वेगाने वाहत होते.पाऊस खूप आणि जोरदार पडत होता. वाऱ्याच्या वेगामुळे मेक्सिकोच्या खाड़ीतल्या पाण्याला भिंतीच्या पलीकडे असणाऱ्या, पोंटचार्टेन तलावात ढकलले होते. त्यामुळे तलावात रोखून धरणारे बांध तुटले होते.

शहरात खूप पाणी भरले गेले. जे लोक वादळात आपल्या घरात लपून राहिले होते त्यांना शेवटी आपले घर सोडावे लागले. त्यांना आपल्या आवडीच्या प्रत्येक गोष्टी सोडाव्या लागल्या. लोकांना सांगितले गेले की तुमचे पाळीव प्राणी तुम्ही बरोबर घेऊ शकत नाही.

बॉब कुत्रा आणि बोबो मांजर मागे राहिले. बॉब कुत्र्याला एका लांब साखळीला बांधले होते. बोबो मांजर, कुत्र्याबरोबर तिथे राहत होती. ती दोघे एकमेकांबरोबर कोणी येण्याची वाट बघत होते.




वादळानंतर देशभरातून स्वयंसेवक मदत करण्यासाठी न्यू ऑरलियन्स पोहचले. त्यांनी जेवण आणि पाणी आणले. त्यांनी घराच्या छतावर अडकलेल्या लोकांना वाचवले आणि त्यांनी कितीतरी प्राण्यांना वाचवले.



पण एवढ्या वाईट परिस्थितीत, दोघे बॉब कुत्रा आणि बोबो मांजराला मदत मिळू शकली नाही. त्यांचे अन्न आणि पाणी संपले होते. बॉब कुत्रा शेवटी मुक्त झाला. तो तुटलेल्या साखळीबरोबर बोबो मांजराकडे आला.






वादळाच्या सुरुवातीच्या दिवसांत दोघेही बॉब कुत्रा आणि बोबो मांजराने चिखलाने भरलेल्या तेलाच्या पाण्यातून आपला रस्ता शोधण्याचा प्रयत्न केला. पाण्याची पातळी कमी झाल्यावर ते ओबडधाबड रस्त्यावरून चालले. त्यांच्याजवळ आपलं म्हणावं असे घर नव्हते.



बॉब कुत्रा आणि बोबो मांजर उद्ध्वस्त झालेल्या शहरात महिनाभर हिंडले. त्यांचे दिवस, रात्र धोकादायक होते. भुकेले, बेघर झालेली कुत्री झुंडीने रस्त्यावर फिरत होती आणि खाणे मिळवण्यासाठी छोट्या जनावरांशी लढत होते. बॉब कुत्र्याला आणि बोबो मांजराला मिळालेले खाण्याचे तुकडे पण कोणी त्यांच्याकडून हिसकावून घेतले का? खूप कमी खायला आणि प्यायला मिळाल्यामुळे बॉब कुत्र्याची हाडे दिसायला लागली. बोबो मांजराच्या शरीरावर पांढरे डाग आता फिक्के पडू लागले होते.





जानेवारीमध्ये एक दिवस, चार महिन्यानंतर बॉब कुत्रा आणि बोबो मांजर एका ठिकाणी फिरत फिरत पोहचले जिथे दुरुस्तीचे काम चालू होते. वादळाने मोडलेले एक मोटल ठीक करण्याचे काम एक निर्माण दल करत होते, त्यासाठी ते हातोडी आणि इतर उपकरणांचा उपयोग करत होते. एका मजुराचा कुत्रा बॉब कुत्र्याबरोबर खेळण्यासाठी धावत गेला.कुत्र्याचा मालक रिचने बोबो मांजरालासुद्धा बघितले. त्याने बघितले की दोघे भटके प्राणी खूप अशक्त झाले आहेत. म्हणून त्याने त्यांना खाणे द्यायला सुरुवात केली.

त्याबे बॉब कुत्र्याची साखळी कापून टाकली, फक्त तेवढीच ठेवली जेवढी ती जमिनीवर पडून वाजत राहिल.ज्यामुळे बोबो मांजर त्याच्या मागे जाऊ शकेल. पण जेव्हा रिच बोबो मांजराला हात लावण्याचा प्रयत्न केला तेव्हा बॉब गुरगुरला.

बॉब कुत्रा आणि बोबो मांजराची एक आठवडा देखभाल केल्यानंतर रिचला एक वाईट बातमी मिळाली. त्याचा बॉस त्याला भेटायला आला. बॉसने एक कुत्रा ठेवण्याची परवानगी दिली होती. दोन कुत्री आणि एक मांजर नाही. बॉसचे म्हणणे होते कि बॉब कुत्रा आणि बोबो मांजराला हाकलून द्यावे.



रिचने त्यांना सुरक्षित स्थानावर घेऊन जाण्याचे ठरवले. पण जेव्हा रिच बोबो मांजराजवळ जाई तेव्हा बॉब कुत्रा नेहमी गुरगुरत असे. बॉब कुत्रा आपल्या मित्राला पकडू किंवा हात लावू देत नव्हता. मग रिचने मांजराला वाटीभर खाणे दाखवले. मग बोबो मांजराने रिचच्या व्हॅनपर्यंत खाण्यासाठी पाठलाग केला आणि बॉब कुत्रा सुद्धा मागे-मागे आला.



रिच त्यांना एका अशा ठिकाणी घेऊन गेला, जिथे प्राणी मित्र सोसायटीने सेलिब्रेशन स्टेशनमध्ये स्थापन केले होते. ते स्थान काही दिवसापूर्वी एक व्हिडियो-गेम आर्केड होते. ते ठिकाण पूर्णपणे बेघर कुत्री आणि मांजरांनी भरलेले होते. पण एका स्वयंसेवकाने त्यांचे स्वागत केले, एवढेच नाहीतर त्याने बॉब कुत्र्याचे आणि बोबो मांजरांचे नाव सुद्धा ठेवले. त्यांना वेगवेगळ्या खोल्यांमध्ये ठेवले गेले.

रात्रभर बॉब कुत्रा भुंकत राहिला. बोबो मांजर सुद्धा मागे-पुढे फिरत राहिली.

बॉब कुत्र्याचे अशा प्रकारे वागण्याने कोणाला झोप आली नाही. म्हणून स्वयंसेवकांनी एक मोठा पिंजरा आणला आणि बोबो मांजराचा छोटा पिंजरा बॉब कुत्र्याच्या पिंजऱ्यात ठेवून दिला.

बॉब कुत्रा, बोबो मांजराच्या समोर येऊन झोपला आणि फुसफुसू लागला.

स्वयंसेवकांनी मग बोबो मांजराचा छोटा पिंजरा उघडला आणि पुढे काय होते आहे ते बघितले

दोन्ही प्राण्यांनी एक-दुसऱ्याच्या नाकाला स्पर्श केला. शेवटी ते दोन्ही मित्र परत एकत्र आले होते.



पुढची काही मिनिटे स्वयंसेवकांनी दोघांचे अध्ययन केले. त्यांनी पहिले की बोबो मांजर, बॉब कुत्र्याजवळ कशी राहते. त्यांनी पहिले कशी ती आपली मान उंच करून चालत असे, आणि किती सावधानतेने आपला पंजा उचलत असे, आणि मग खाली ठेवत असे. जसे की आपण पाय कुठे ठेवत आहोत हे तिला माहित नाही असे वाटत होते.

बोबो मांजराच्या समोरून कोणीतरी हात हलवला. पण बोबो मांजर मागे सरकले नाही. मग एका दुसऱ्या स्वयंसेवकाने आपला हात तिच्या डोळ्यासमोरून नेला पण तिने पापणी पण हलवली नाही. सगळ्यांना आश्चर्य वाटले.


बोबो मांजर अंध होते!

त्यापूर्ण काळात बोबो मांजराने बॉब कुत्र्याच्या नजरेने बघितले होते.





स्वयंसेवकांनी एवढेच नाही तर पाळीव प्राणी तज्ञांनी त्याच्या कुटुंबाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पण त्यात यश मिळाले नाही. एक महिन्यानंतर सेलिब्रेशन स्टेशनचे दरवाजे बंद करण्यात आले. पण बॉब कुत्र्याकडे आणि बोबो मांजराकडे आपले असे कोणतेच घर नव्हते. प्रयत्न करण्यासाठी फक्त एक पर्याय उपलब्ध होता.



बॉब कुत्रा आणि बोबो मांजर दोघेही CNN च्या एंडरसन कूपर ३६०° टेलीव्हिजन शो मध्ये सामील झाले.



दुसऱ्याच दिवशी, बेस्ट फ्रेंड्सच्या स्वयंसेवकांनी न्यू ऑरलियन्स शहर सोडले. त्यातल्या एक स्वयंसेवकाने बॉब कुत्र्याला आणि बोबो मांजराला यूटा मधल्या बेस्ट फ्रेंड्स एनिमल सैंक्चुअरी मध्ये नेले. त्यांना तिथे तोपर्यंत राहायचे होते जोपर्यंत त्यांना तिथे एखादा नवीन परिवार मिळत नाही. बातमी आली तेव्हा ते पश्चिमेकडे जात होते.

टेलीव्हिज़नवर आल्यावर शेकडो लोकांना ते हवे होते.

त्यांना एकत्र ठेवून घेणाऱ्या एका खास कुटुंबाची गरज होती. स्वयंसेवकांनी एक मोठी यादी तयार केली आणि दत्तक घेण्याची इच्छा असणाऱ्या सर्व कुटुंबांना या दोन प्राण्यांना भेटण्यासाठी बोलावले.

केवळ मेलिंडा आणि तिचे कुत्रे बोस्टन टेरियर गस-गस यांनी यूटाचा लांबवरचा प्रवास केला. त्या रात्री बॉब कुत्रा आणि बोबो मांजर, मेलिंडा आणि गस-गस बरोबर अभयारण्याच्या एका कॉटेजमध्ये झोपले. ते दोन प्राणी मेलिंडाला पसंत करतील आणि निवडतील?



दुसऱ्या दिवशी सकाळी सगळ्यांना या प्रश्नांचे उत्तर मिळाले. बॉब कुत्रा आणि बोबो मांजर मेलिंडाला वेल्क्रोसारखे एकमेकांना चिकटले होते. गस-गसपण त्यांना आवडला होता आणि त्यालाही ते आवडले होते.

शेवटी, बॉब कुत्र्याला आणि बोबो मांजराला आपले नवीन कुटुंब मिळाले होते.



आता ते दोन्ही प्राणी, मेलिंडा, गस-गस आणि अमेलिया बरोबर दक्षिणी ओरेगनच्या एका फार्म वर राहतात. बोबो मांजराकडे बसण्यासाठी खिडकीजवळ एक जागा आहे. तिला रोबोट व्हॅक्यूम क्लीनरबरोबर खेळायला आवडते. ती ते आपली आपण चालू करू शकते. बॉब कुत्रा फार्मच्या इतर कामात मदत करतो. तो कधी-कधी घोडे सवारी पण करतो. उन्हाळ्याच्या दिवसात ते दोघे तलावात आराम करतात.

दिवसाच्या शेवटी रोज बॉब कुत्रा आणि बोबो मांजर एक दुसऱ्यांना भेटतात.त्यांच्याकडे सर्व प्रकारची खेळणी आहेत आणि खूप सारे नवीन मित्रही आहेत-एवढेच नाही तर उंट सुद्धा.

सगळ्यात महत्वाचे म्हणजे ते दोघे एकमेकांसाठी आहेत.



वादळानंतर

हज़ारों लोकांसारखे, जेव्हा कॅटरीना वादळाने न्यू ऑरलियन्सवर येऊन आदळले तेव्हा बॉब कुत्रा आणि बोबो मांजर आपला परिवार हरवून बसले. मेलिंडा आणि गस-गस बरोबर राहिल्यानंतर त्यांच्या पशुचिकित्सकाने बोबो मांजराच्या कानातील मळ आणि वाळूचा शोध घेतला. तिच्या उजव्या कानाचा पडदा फाटला होता.बॉब कुत्र्याने मांजराला गढूळ पाण्यापासून वाचवले होते का? जे न्यू ऑरलियन्स मध्ये भरलेले होते. कोणालाच हे कधी कळणार नाही. पण असे झालेले असू शकते कि बोबो मांजरासारखे अंध मांजर बॉब कुत्र्याच्या संरक्षणा शिवाय वाचू शकत नाही. त्याबदल्यात बोबो मांजराने आपल्या मैत्रीने बॉबला एवढे मजबूत केले की ते पुढे जात राहिले,

बॉब कुत्रा आणि बोबो मांजर कॅटरीना वादळातून वाचले.

त्यांनी या वादळात एकमेकांना आपल्या पंजाचा आधार दिला.

